# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

## MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.५०** **(स्थायी समिती)**

---

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- २७४** **दिनांक :-११/०७/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.१३/०६/२०२५ शुक्रवार रोजी सकाळी - ११.०० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.४९ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.१३/०६/२०२५ शुक्रवार रोजी सकाळी - ११.०० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.४९ चे कार्यवृत्त कायम करणे.

---

वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.१३/०६/२०२५ शुक्रवार रोजी सकाळी - ११.०० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.४९ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ५०** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०२** **प्रशासक ठराव क्र.:-२७५** **दिनांक :-११/०७/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. प्रकल्प अभियंता, प्रकल्प विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./प्रकल्प विभाग/६३/२०२५ दि.२४/०६/२०२५
३. प्रकल्प अभियंता यांचा दि.११/०६/२०२५ चा अभिप्राय.
४. शहर अभियंता यांचा दि.११/०६/२०२५ चा अभिप्राय.
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.११/०६/२०२५ चा अभिप्राय.
६. आयुक्त यांचा दि.११/०६/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** जळगांव महानगरपालिकेचे मलप्रक्रिया केंद्र झोन १ व ४ पूर्ण झालेले असून कार्यान्वित झालेले आहे मलनिस्सारण प्रकल्पाचे १२ महीने दैनंदिन परिचालन करुन घेणे व मलवाहिन्या व मॅनहोल देखभाल करणेबाबत.

---

वाचा क्र.१ व प्रकल्प अभियंता, प्रकल्प विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहरात केन्द्र शासनाने अमृत अभियाना अंतर्गत मलमिश्रीत सांडपाण्याचे प्रभावी व्यवस्थापन व त्यावर प्रक्रिया करुन नागरिकांच्या आरोग्याचे हित जोपासण्यासाठी, शहरातील झोन क्र.०१ आणि झोन क्र.०४ या भागात विविध व्यासाच्या पाईप लाईन, हाऊस चेंबर, मॅनहोल्स/मेन चेंबर यांचा समावेश असलेले भुमिगत नेटवर्क व शिवाजीनगर या भागात ४८ MLD क्षमतेचा आधुनिक मलनिस्सारण प्रकल्पाची उभारणी करण्यात आलेली आहे. व सदरील प्रकल्पास वीजपुरवठा करणेकामी शिवाजी नगर येथिल म.रा.वि.वि कंपनीकडील वीज उपकेंद्र येथून ते प्रकल्प पर्यंत एक्सप्रेस फीडर ची उभारणी करण्यात आलेली असून, माहे जुलै २०२४ पासून वीजपुरवठा सुरु होऊन, सदरील मलनिस्सारण प्रकल्प कार्यान्वित ठेवण्यात येतो व दैनंदिन मल वाहिन्याव्दारे आलेल्या पाण्यावर प्रक्रिया करण्यात येत असते. सदरील प्रकल्पाअंतर्गत मलवाहिन्याव्दारे वाहून आणलेले पाणी उपसा करणेकामी एकूण ७ विविध क्षमतेचे पाणबुडी प्रकारातील मड पंप व त्यावर प्रक्रिया करणेकामी स्क्रीन चेंबर, ऐरीयेशन करणेकामी एकूण ६ ब्लोअर (४ कार्यरत + २ राखीव), RAS पंप, SAS पंप, स्लज Dewatering युनिट, Chlorination प्लांट, पॅनल रुम, AFSC पॅनल, जनरेटर व पॅनल, स्काडा सिस्टम, सब स्टेशन, इत्यादी ची मांडणी करण्यात आलेली आहे. सदर यंत्रणेचे परिचालन करण्यात येऊन दैनंदिन स्वरुपात मलमिश्रित पाण्यावर प्रक्रिया करण्यात येत असते, तसेच सदर ठिकाणी मलावर प्रक्रिया करणेकामी उपयोगात आणले जात असल्याने, प्रक्रिया केन्द्र व परिसराची स्वच्छता, तेथील प्रशासकीय कामकाजाच्या नोंदी ठेवणे इत्यादी दैनंदिन स्वरुपात महत्वाची कामे सदर ठिकाणी करण्यात येत असतात. तरी मलनिस्सारण प्रकल्प येथे दि.०१/०८/२०२४ पासून ६ महिन्यासाठी टेस्टिंग अँड ऑपरेटिंग चा काळ सुरु असुन सदयस्थितीत सदर प्रकल्प उभारणी करणेकामी निविदेव्दारे निवडण्यात आलेल्या कंपनीकडुन पुरविण्यात आलेल्या कर्मचाऱ्या मार्फत प्रकल्पाचा कार्यभार सांभळण्यात येत आहे, परंतु या चाचणी कालावधीनंतर मलनिस्सारण प्रकल्प अंतर्गत येणाऱ्या विविध स्थापत्य, यांत्रिकी व विदयुत यंत्रणेचे दैनंदिन परिचालण आणि व्यवस्थापन करणेकामी सोबत नमूद तक्ता अन्वये तांत्रिक व अतांत्रिक मनुष्यबळाची आवश्यकता आहे.

| Sr | Praticulars | Nos |
|---|---|---|
| १ | Plant incharge/supervisor | १ |
| २ | Computer Operator | १ |
| ३ | Pump Driver/Operators | ४ |

| | | |
|---|---|---|
| ४ | Chemist | १ |
| ५ | Electrician | ४ |
| ६ | Plumber (Pipeline) | १ |
| ७ | Helper | ४ |
| ८ | Gardener/Mali | १ |
| ९ | Sweeper/major | २ |
| १० | Fitter | १ |
| ११ | Wireman | ३ |
| १२ | Watchman | ७ |
| | TOTAL - | ३० |

तसेच सदयास्थितीत नागरिकांच्या सांडपाण्याची जोडणी करणेची कार्यवाही महानगरपालिकेच्या परवानाधारक प्लंबरकडुन सुरु आहे. काही भागात जोडण्या झालेल्या असून मलनिस्सारण पाईप लाईन मधून सांडपाणी प्रवाहीत होत आहे. त्यामुळे झोन ०१ व झोन ०४ मधील पाणी वाहून जात नसल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत तक्रारीनुसार सदयास्थितीत कंपनीकडुन पुरविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यामार्फत चोकिंग काढणे, चेंबर ची ऊंची वाढवणे संदर्भातील कामे केली जात आहेत. तसेच शासनामार्फत capacity suction and jetting machine with water recycling facility यंत्र उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देशित केलेले आहे. परंतु अदयाप पावेतो सदरील यंत्र मनपास प्राप्त झालेले नसल्याने पर्यायी व्यवस्था करणे गरजेचे आहे. तरी उपरोक्त नमूद कामे करुन घेणेकामी विभागीय दरसूची म जी प्र २०२३-२४/सा.बा.वि सन २०२२-२०२३ अन्वये रक्कम रु.१,५६,८२,४४१/- मात्रचे अंदाजपत्रक बनविण्यात आलेले आहे. तरी सदरील प्रकल्पाचे १२ महीने दैनंदिन परिचालन देखभाल करुन घेणे व मलवाहिन्या व मॅनहोल देखभाल करणेकामी जळगांव महानगरपालिकेचे मलप्रक्रिया केंद्र झोन १ व ४ पूर्ण झालेले असून कार्यान्वित झालेले आहे. यानंतर ०६ महीने मक्तेदाराच्या वतीने या केंद्राचे देखभाल सुरु आहे. सदयस्थितीत पुढील निवडणुकीच्या आचार संहीता कालावधीचा विचार करता आजस्थितीस मलनिस्सारण प्रकल्पाच्या देखभाल व दुरुस्तीचे कामाची निविदा प्रसिध्द करुन मक्तेदार निश्चिती करुन ठेवणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या सन २०२५-२०२६ च्या अर्थ संकल्पात भाग-२ (क-३) मलनिस्सारण शीर्षाखाली रु.३,००,००,०००/- अंदाजित रकमेची तरतूद केलेली आहे. योजना परीचालन, देखभाल व दुरुस्ती कामी रु.१,५६,८२,४४१/- खर्चास प्रशासकीय मान्यता व निविदा प्रसिध्द करणेस मान्यता मिळणेसाठी प्रकल्प अभियंता, प्रकल्प विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ५०** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-**०३ **प्रशासक ठराव क्र.:-** २७६ **दिनांक :-११/०७/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./वाहन व्यवस्था विभाग/२९/२०२५-२६ दि.०१/०७/२०२५
३. सहाय्यक आयुक्त (वाहन) यांचा दि.०४/०६/२०२५ चा अभिप्राय
४. उपायुक्त (वाहन) यांचा दि.०९/०६/२०२५ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.११/०६/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.११/०६/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** महानगरपालिका विविध विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) १२००० लिटर खरेदी करणेसाठी मान्यता मिळणे बाबत.

---

वाचा क्र.१ व वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

पंप ऑपरेटर यांच्या दि.३०/०५/२०२५ चे रिपोर्टनूसार म.न.पा. वाहनांसाठी डिझेलसाठा ४६४० लिटर शिल्लक असुन लागणारा शिल्लक डिझेल साठानुसार ५ ते ६ दिवसांसाठी पुरवठा होईल. सबब पंप ऑपरेटर यांनी मागणी क्रं.१४११४ दि.३०/०५/२०२५ अन्वये १२,००० लिटर डिझेलची मागणी केलेली आहे.

दि.०९/०७/२०२२ पासून डिझेल (ठोक/बल्क) खरेदी आणि किरकोळ डिझेल खरेदी यांच्या दरात (रेट) फरक असल्याने मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडुन दि.०८/०७/२०२२ पासून किरकोळ डिझेल खरेदी महासभा/स्थायी समितीच्या मान्यतेने सुरु आहे. किरकोळ डिझेल खरेदी दर (बाजार भाव) व बल्क दर या दोघामध्ये जो पर्यंत फरक राहील तो पर्यंत बाजार भावातून किरकोळ इंधन खरेदी करणे महानगरपालिकेस फायदेशीर राहील. मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव यांचे दर प्रति लिटर एकुण रक्कम रु.९२.०३ मात्र आहेत.

महासभा ठराव क्रं.१२७० दि.२३/०८/२०२३ अन्वये तसेच स्थायी समितीने वेळावेळी पारीत केलेल्या ठरावानुसार आवश्यकतेप्रमाणे १२००० लिटर्सचा पुरवठा आदेश देवून किरकोळ डिझेल मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून किरकोळ दरात डिझेल खरेदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार निविदा न मागविता किरकोळ डिझेल खरेदी करण्यात येत आहे.

मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांना मागील देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील वाहन चालक व विभाग प्रमुखांच्या मागणीनुसार दि.३०/०५/२०२५ ते आज पावेतो किरकोळ स्वरुपात इंधन (डिझेल) चा पुरवठा केलेला आहे. तसेच मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव हा पंप एम.आय.डी.सी. रोडवर असल्याने सदर पंपावरुन म.न.पा. वाहनांसाठी डिझेल घेणे सोईचे होईल.

तात्पुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (डिझेल) किरकोळ स्वरुपात १२००० लिटर डिझेल खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.२०२४-२५/१६ दि.३०/०५/२०२५ अन्वये रक्कम रु.११,०४,३६०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार निविदा न मागविता मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्या कडुन १२००० लिटर किरकोळ डिझेल खरेदी करणेस व या कामी येणाऱ्या एकुण रक्कम रु.११,०४,३६०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळण्यासाठी वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**जळगाव शहर महानगरपालिका जळगाव**
महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०
**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र. ५०** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०४** **प्रशासक ठराव क्र.:- २७७** **दिनांक :-११/०७/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./आरोग्य विभाग/३२३/२०२५-२६ दि.२६/०६/२०२५
३. उपायुक्त यांचा दि.२०/०६/२०२५ चा अभिप्राय
४. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.२०/०६/२०२५ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा दि.२३/०६/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहरातील मेलेले जनावरे उचलून त्यांची विल्हेवाट लावणे कामी १)श्री.नंदु शहादु नाडे, २)श्री.अशोक रामा सोनवणे यांची तात्पुरत्या स्वरुपात मानसेवी कामगार म्हणून मानधनावर ६ महिन्याकरिता नेमणूक करणेबाबत.

वाचा क्र.१ व सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महाराष्ट्र महानगरपालिका १९४९ चे कलम ३०९ (१) नुसार शहरातील मेलेले जनावरांची प्रेत उचलून त्यांची विल्हेवाट लावणे महापालिकेचे कर्तव्य आहे. अर्जदार / मानसेवी कामगार श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे यांनी दि.०६/०६/२०२५ रोजी अर्ज देवून शहरातील मेलेले जनावरे उचलणे कामाकरिता ६ महिने करिता मुदत वाढीचा अर्ज केलेला आहे.

श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे, मानसेवी कामगार हे गेल्या १५ ते २० वर्षापासून ६ महिन्याचे मुदतीवर प्रत्येकी रु.१६,९२०/- प्रमाणे मानधनावर दोन्ही कामगार शहरातील दैनंदिन मेलेले जनावरे उचलणेचे काम व्यवस्थित करित असून प्रशासक ठराव क्रं.२१६ दि.१५/०१/२०२५ मंजूरी अन्वये दरमहा रु.१६,९२०/- मानधनावर शहरातील मृत जनावरे उचलून त्यांची विल्हेवाट लावणे करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ अन्वये अटी शर्तीस अधीन राहून तात्पुरती नियुक्ती करणेस मान्यता प्रदान केलेली आहे. सदरची ६ महिने मुदत दि.१३/०६/२०२५ रोजी संपत असल्याने पुढील ६ महिन्याच्या कालावधीसाठी पुन्हा दोन दिवसांचा खंड देवून मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

करिता श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे, मानसेवी कामगार यांना पुर्वीच्या नियुक्ती मध्ये २ दिवसांचा खंड देवून दि.१६/०६/२०२५ ते दि.१५/१२/२०२५ पर्यंत सहा महिन्याचा मुदतवाढीच्या येणाऱ्या रक्कम रु.२,०३,०४०/- मात्रचे खर्चास व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ अन्वये अटी शर्तीस अधीन राहून तात्पुर्ती नियुक्ती देणेस तसेच मानसेवी कामगारांचे मानधन देणे करिता सन-२०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये अंदाजपत्रकीय (रोजंदारी/मानधन) या लेखाशिर्षा अंतर्गत रु.२१ लक्षची तरतूद करण्यात आलेली आहे. सदर मुदतवाढीचा प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सही/-
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ५०** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-** ०५ **प्रशासक ठराव क्र.:-** २७८ **दिनांक :-११/०७/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./आरोग्य वि./३५५/२०२५-२६ दि.१०/०७/२०२५
३. सहाय्यक आयुक्त (आरोग्य विभाग) यांचा दि.१०/०७/२०२५ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि. १०/०७/२०२५ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि. १०/०७/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि. १०/०७/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहरातील भटकी व मोकाट कुत्री पकडुन (प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदा १९६०, महाराष्ट्र संरक्षण प्राणी कायदा १९७६ आणि प्राणी उत्पत्ती प्रतिबंधक कायदा २००१ नुसार) नसबंदी शस्त्रक्रिया करणे तद्नंतर ॲन्टी रेबीज लसीकरण करुन उजव्या कानावर V नॉच करुन पकडलेल्या पुर्ववत ठिकाणी कुत्रे सोडणेकामी L१ निविदाधारक उत्कर्ष ग्लोबल फाऊडेशन, मुंबई यांचे सोबत करारनामा करुन कार्यादेश देणेस निर्णय घेणे.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

ई-निविदा क्रं. ०९/२०२५-२६ करिता जळगांव शहरातील भटकी व मोकाट कुत्री पकडुन (प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदा १९६०, महाराष्ट्र संरक्षण प्राणी कायदा १९७६ आणि प्राणी उत्पत्ती प्रतिबंधक कायदा २००१ नुसार) नसबंदी शस्त्रक्रिया करणे तदनंतर ॲन्टी रेबीज लसीकरण करुन उजव्या कानावर V नॉच करुन पकडलेल्या पुर्ववत ठिकाणी कुत्रे सोडणेकामी सदरच्या कामासाठी ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडीया (AWBI) मान्यता प्राप्त संस्थेची निवड करणे करिता आरोग्य वि./जा.क्र./३३/२०२५-२६ दि.१५/०४/२०२५ अन्वये वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली होती.

सदर मुदतीत ०५ अभिकर्त्यांनी सहभाग नोंदविलेला असून दि.२४/०६/२०२५ रोजीच्या निविदा समितीच्या मान्यतेनुसार ई-निविदेच्या तांत्रिक अटी दस्तऐवज लिफाफा क्रं. १ (तांत्रिक लिफाफा) उघडण्यात आलेली असून त्यांची नावे पुढील प्रमाणे १) उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन, मुंबई २) युनिवर्सल अनिमल वेल्फेअर सोसायटी, बिड ३) आसरा ॲनिमल वेल्फेअर ऑर्रगनाईजेशन, बंगलौर ४) वेस्ट सोसायटी फॉर ॲनिमल वेल्फेअर अँड रुरल डेव्हल्पमेंट, बंगलौर ५) नवसमाज निर्माण बहुउद्देशिय संस्था, नंदुरबार

५ अभिकर्त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची ई-निविदा समितीने छाननी केली असता नवसमाज निर्माण बहुउद्देशिय संस्था, नंदुरबार हे अपात्र ठरत असून १) उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन, मुंबई २) युनिवर्सल अनिमल वेल्फेअर सोसायटी, बिड ३) आसरा ॲनिमल वेल्फेअर ऑर्रगनाईजेशन, बंगलौर ४) वेस्ट सोसायटी फॉर ॲनिमल वेल्फेअर अँड रुरल डेव्हल्पमेंट, बंगलौर हे पात्र ठरत आहे.

वरील पात्र ४ अभिकर्त्यांचे ई-निविदा समितीच्या दि.२७/०६/२०२५ रोजीच्या मान्यतेने लिफाफा क्रं. २ (आर्थिक लिफाफा) उघडले असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Work / Item Description | Quantity | वेस्ट सोसायटी फॉर ॲनिमल वेल्फेअर अँड रुरल डेव्हल्पमेंट, बंगलौर | उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन, मुंबई | युनिवर्सल अनिमल वेल्फेअर सोसायटी, बिड | आसरा ॲनिमल वेल्फेअर ऑर्रगना ईजेशन, बंगलौर |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Selection of AWBI Registered organization for work of Stray Dogs Catching, sterilization surgery, Spaying Castration, anti-rabies vaccination, taking care after with food for ५ days by V notching on the right ear of the Dog, and then release of dogs at the place where they were captured location as per Animal Birth Control Rule २०२१, २०२३ and as per Prevention of Animal Act १९७६ and Prevention of Animal Breeding Act २००१ for २ years at JCMC Jalgaon. | १.०० | १६९५/- | ११९९/- | १६३५/- | १६५०/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मे. उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन, मुंबई यांचे प्रति श्वाना करिता रु.११९९/- सर्वात कमीचे दर प्राप्त झालेले असून दराचे विश्लेषना करिता आयुक्त यांचे दालनात ई-निविदा समिती समक्ष दि.१०/०७/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता उपस्थित राहणे कामी पत्र क्रं. जा.क्र./३४७/२०२५-२६ दि.०७/०७/२०२५ रोजी पत्रान्वये कळविण्यात आलेले होते.

सदर पत्राच्या अनुषंगाने दि.१०/०७/२०२५ रोजी आयुक्त यांचे दालनात ई-निविदा समिती यांचे समक्ष चर्चा करुन उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन, मुंबई यांनी रु.११९९/- प्रती श्वान प्रमाणे दर विश्लेषण सादर करुन सदर दरात काम करणेस सहमती दर्शविली असुन सदर दरास ई-निविदा समितीने दि.१०/०७/२०२५ रोजी मान्यता दिलेली आहे.

मे. उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन, मुंबई यांनी रु.११९९/- प्रती श्वान प्रमाणे सादर केलेले दर स्विकृत करुन येणारा खर्च हा मनपा फंडातुन (लेखाशिर्ष - मोकाट कुत्र्यांवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया) या मधून करणेस, तसेच संस्थेसोबत संविदा करुन कार्यादेश देणेस मान्यता मिळणेसाठी सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सही/-
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ५०** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०६** **प्रशासक ठराव क्र.:-** २७९ **दिनांक :-११/०७/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./आरोग्य वि./३५६/२०२५-२६ दि.१०/०७/२०२५
३. सहाय्यक आयुक्त (आरोग्य विभाग) यांचा दि.०९/०७/२०२५ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि. ०९/०७/२०२५ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि. ०९/०७/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि. १०/०७/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका मालकीचा कोंडवाडा मोकाट व भटक्या जनावरांना बंदीस्त करुन देखभालकरीता ३ वर्षे कालावधीसाठी स्व.सौ.सुगनबाई शिवप्रकाश चांगरे गो-सेवा संस्था, मु.पो.वसंतवाडी, ता.जि.जळगांव यांचे सोबत करारनामा करुन कार्यादेश देणे बाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका मालकीचा कोंडवाडा मोकाट व भटक्या जनावरांना बंदीस्त करुन देखभालकरीता ३ वर्षे कालावधीसाठी देणे बाबत दैनिक साईमत या वृत्तपत्रात दि.०३/०६/२०२५ रोजी जाहिर सूचना प्रसिध्द केली असता दि.०३/०६/२०२५ ते ०९/०६/२०२५ रोजी दुपारी ४:०० वाजेपावेतो मुदतीत सिलबंद १) शिवसुगंध मेहतर वाल्मीकी समाज बहुउद्देशिय संस्था, जळगांव, २) स्व. सौ. सुगनबाई शिवप्रकाश चांगरे गो-सेवा संस्था, मु.पो. वसंतवाडी, ता.जि.जळगांव, ३) सुविधा सॅनिस्टेशन सर्व्हिसेस सर्वोत्तम नगर, जळगांव ३ दरपत्रक पाकीटे प्राप्त झालेली आहेत.

वरील प्राप्त झालेल्या ३ दरपत्रक धारकांनी सादर केलेल्या सिलबंद पाकीटातून सहा.आयुक्त (आरोग्य) यांच्या दि.१८/०६/२०२५ रोजीच्या मान्यतेने लिफाफा क्रं. १ उघडले असता तिन्ही दरपत्रक धारकांनी दरपत्रकात सादर केलेली दस्तऐवज लिफाफा क्रं. १ (तांत्रिक लिफाफा) मधील अ.क्र. १ ते १० दस्तऐवजांची निविदा समितीने छाननी अंती तिन्ही दरपत्रक धारक पात्र ठरत आहे.

दरपत्रक धारकांनी सादर केलेल्या लिफाफा क्रं. २ (आर्थिक लिफाफा) निविदा समिती यांच्या मान्यतेने दि.०९/०७/२०२५ रोजी समक्ष उघडले असता खालील प्रमाणे स्वामित्व शुल्क प्राप्त झालेले आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | शिवसुगंध मेहतर वाल्मीकी समाज बहुउद्देशिय संस्था, जळगांव | स्व. सौ. सुगनबाई शिवप्रकाश चांगरे गो-सेवा संस्था, मु.पो. वसंतवाडी, ता.जि.जळगांव | सुविधा सॅनिस्टेशन सर्व्हिसेस सर्वोत्तम नगर, जळगांव |
|---|---|---|---|---|
| १. | म.न.पा. मालकीचा कोंडवाडा खाजगी नोंदणीकृत गोरक्षण संस्थेस ३ वर्ष कालावधीसाठी देखभालीसाठी देणे, या कामासाठी म.न.पा.ने ठरवून दिलेल्या अटी व शर्ती मला मान्य आहे. म.न.पा. कडून कोणताही खर्च आमची संस्था घेणार नाही. तसेच आमचे संस्थेस मिळणाऱ्या रक्कमेतून २५ % पेक्षा जास्त स्वामित्वची रक्कम म.न.पा.स देण्यास तयार आहे. | स्वामित्व शुल्क २६ % | स्वामित्व शुल्क ३० % | स्वामित्व शुल्क २८ % |

दरपत्रकातील आर्थिक लिफाफा उघडला असता स्व. सौ. सुगनबाई शिवप्रकाश चांगरे गो-सेवा संस्था, मु.पो. वसंतवाडी, ता.जि.जळगांव हे संस्थेस मिळणाऱ्या रक्कमेतून स्वामित्व शुल्क ३०% सर्वात जास्तीचे प्राप्त झालेले असून सदर दरास व संस्थेसोबत करारनामा करुन कार्यादेश देणेस मान्यता मिळणेसाठी सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ५०** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-**०७ **प्रशासक ठराव क्र.:-** २८० **दिनांक :-११/०७/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./आरोग्य वि./३६० /२०२५-२६ दि.१०/०७/२०२५
३. सहाय्यक आयुक्त (आरोग्य विभाग) यांचा दि.१०/०७/२०२५ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि. १०/०७/२०२५ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि. १०/०७/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि. १०/०७/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** जुने बसस्थानक येथील सार्व.शौचालय पे-ॲण्ड युज तत्वार देणेकामी स्वच्छता दुत बचत गट जळगांव यांचे प्राप्त देकार स्वामित्व शुल्क ११% या दरास मान्यता मिळणेबाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जुने बसस्थानक येथील नव्याने बांधलेले आधुनिक वातानुकूलित सार्वजनिक शौचालय पे ॲण्ड युज तत्वावर चालविणे कामी खाजगी संस्थेस देणेकरीता एकुण प्राप्त ३ निविदांचा लिफ़ाफ़ा क्रं.२.(दराचा-आर्थिक) सहाय्यक आयुक्त (आरोग्य) यांचे कार्यालयात निविदाकार व त्यांचे प्रतिनीधी यांच्या समक्ष उघडण्यात आले आहे.निविदाकार यांनी लिफ़ाफ़ा क्रं.२. मध्ये सादर केलेल्या देकाराचा तुलनात्मक तक्ता खालिलप्रमाणे आहे.

| अ.क्रं. | निविदाकार संस्थेचे नांव | सादर केलेल्या देकाराची टक्केवारी | सर्वाधिक टक्केवारी सादरकर्ता निविदाकार |
|---|---|---|---|
| १ | मे.ग्लोबल व्हिजन फाऊडेशन,जळगांव | ५% | स्वच्छता दुत बचत,जळगांव ११% |
| २ | मे.अक्षय एजन्सी स.नं.५३/३ बी प्लॉट नं.१० मारुती एनक्लेव्ह बी.टी.कवडे रोड घोरपडी पुणे | ३.५०% | |
| ३ | स्वच्छता दुत बचत गट ,जळगांव | ११% | |

उपरोक्त नूसार प्राप्त निविदा देकार टक्केवारीचा तुलनात्मक तक्ता पाहता स्वच्छता दुत बचत गट, जळगांव. यांनी सादर केलेले देकार टक्केवारी ११% सर्वाधिक असून ते स्विकारण्यास हरकत वाटत नाही. करिता निविदाकार स्वच्छता दुत बचत गट जळगांव, यांचे दर स्विकारणेस व त्यास मान्यता मिळणेसाठी सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ५०** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०८** **प्रशासक ठराव क्र.:- २८१** **दिनांक :-११/०७/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./आरोग्य वि./३५९ /२०२५-२६ दि.१०/०७/२०२५
३. सहाय्यक आयुक्त (आरोग्य विभाग) यांचा दि.१०/०७/२०२५ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि. १०/०७/२०२५ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि. १०/०७/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि. १०/०७/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** नविन बसस्थानक येथील सार्व.शौचालय पे-ॲण्ड युज तत्वावर देणेकामी मे.सुविधा सॅनिटेशन सर्व्हिसेस जळगांव यांचे प्राप्त देकार स्वामित्व शुल्क ४१% या दरास मा.स्थायी समिती / मा.प्रशासक यांची मान्यता मिळणे बाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

नविन बसस्थानक येथील नव्याने बांधलेले आधुनिक वातानुकूलित सार्वजनिक शौचालय पे ॲण्ड युज तत्वावर चालविणे कामी खाजगी संस्थेस देणेकरीता निविदा देकार टक्केवारीचा तुलनात्मक तक्ता पाहता मे.सुविधा सॅनिटेशन सर्व्हिसेस जळगांव.यांनी सादर केलेले देकार/स्वामित्व शुल्क दर टक्केवारी ४१% सर्वाधिक असून ते निविदा समितीकडून स्विकारण्यात आले आहे. यशस्वी निविदाकार यांनी सुरक्षा ठेव अनामत रक्कम २,००,०००/- पुर्ण मनपा खजिन्यात भरणा केलेली आहे.व त्याबाबतचे पावती सादर केलेली आहे.

करीता यशस्वी निविदाकार यांना कार्यादेश देणेपुर्वी सदरचे सर्वाधिक ४१% प्राप्त देकार/स्वामित्व शुल्क दरास मान्यता मिळणेसाठी सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र. ५०** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०९** **प्रशासक ठराव क्र.:- २८२** **दिनांक :-**११/०७/२०२५

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./बांधकाम/४०४/२०२५-२६ दि.१०/०७/२०२५
३. शहर अभियंता यांचा दि.२०/०६/२०२५ चा अभिप्राय
४. निविदा समितीचा निर्णय

**विषय :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.११ अंतर्गत पिंप्राळा शिवारामध्ये कॉलन्यांमध्ये रस्ते डांबरीकरण करणे कामी मक्तेदार संदेश ज्ञानदेव टेकाडे & कंपनी यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दरास मान्यता देणे बाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ४ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.११ अंतर्गत पिंप्राळा शिवारामध्ये कॉलन्यां मध्ये रस्ते डांबरीकरण करणे कामास जिल्हाधिकारी, जळगांव यांचे कडील पत्र क्रं. न.प.शाखा/जि.प्र.क्र.-४/ई-ऑफीस/१४१२४९२/२०२५ दि. १२/०३/२०२५ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार ई निविदा प्रसिध्द करण्यास आयुक्त, मनपा यांचे दि २०/०३/२०२५ च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं. ५९५ प्रसिध्द केल्यानुसार संगणका व्दारे निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०४ ई- निविदा सदर संकेस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ मंत्रालय मुंबई दिनांक २७/०९/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार तिन निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे त्यानुसार आलेल्या ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांचे फोल्डर क्रं. १ उघडले असता ०४ मक्तेदारांचे उक्त कामाचे प्राप्त झालेले ई-निविदा कागदपत्रांचे संबंधीत युनिट अभियंता व सार्व.बांधकाम विभागाचे उपलेखापाल यांनी छाननी केली असता. निविदा धारक (१) सुशिलकुमार गणपत डोंगरे (२) अनंत आर पाटील यांना अपात्र ठरविण्यात आले आहे. व खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने निविदा समितीने सर्वानुमते शिफारस केली असुन आयुक्त यांनी मान्यता दिल्यानुसार त्यांचे ई निविदा फोल्डर नं. २ दि.१९/१२/२०२४ रोजी ओपन करुन उक्त मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु. ८३२३६७३/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | शिवशक्ती कंन्स्ट्रकशन | निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दराने | ८९०६३३०/- |
| २ | संदेश ज्ञानदेव टेकाडे & कंपनी | निविदा रक्कमेइतकेचेच दराने | ८३२३६७३/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार संदेश ज्ञानदेव टेकाडे & कंपनी यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार रक्कम रु.८३२३६७३/- मात्रचा खर्च अपेक्षीत आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टीग चार्जेस, व रॉयलटी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | वाटाघाटी अंति अपेक्षीत खर्च रक्कम | ८३२३६७३/- |
| ०२ | जि.एस.टी.१८% | १४९८२६१/- |
| ०३ | कामगार विमा १% | ८३२३७/- |
| ०४ | टेस्टीग चार्जेस | ३०२८०/- |
| ०५ | रॉयलटी चार्जेस | ६४२६२/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. :- | ९९९९७१३/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. ९९९९७१३/-मात्र आहे. सदर रक्कमेपैकी रक्कम रु. ९९९९७१३/- मात्र महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विकासा साठी विशेष तरतुद योजने अंतर्गत शासनाने वितरीत केलेल्या १.०० कोटी अनुदाना अंतर्गतच्या निधीतुन करावा लागणार आहे. त्याअनुषंगाने मक्तेदार संदेश ज्ञानदेव टेकाडे & कंपनी यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर स्विकारण्यास मनपा निविदा समिती यांची दरास मान्यता होण्याकरीता शिफारस होण्यासाठी प्रस्ताव सादर करते वेळी मक्तेदार श्री.अनंत राधेश्याम पाटील यांनी डिस्टन सर्टिफीकेटवर शहर अभियंता यांची स्वाक्षरी नसल्याने मला अपात्र ठरविण्यात आले परंतु सदर कामी मला शॉर्ट फॉल न देता अपात्र ठरविण्यात आले याबाबत निविदेची माहिती घेवुन पुढिल कार्यवाही करण्याबाबतचे दि.२३/०५/२०२५ रोजी पत्र दिलेले आहे. सदर पत्राचे शाहनिशा करुन सदरचे पत्र मनपा जशमनपा/साबा/२७० दि.१०/०६/२०२५ पत्रान्वये निकाली काढुन नस्तीबंद करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने मक्तेदार संदेश ज्ञानदेव टेकाडे & कंपनी यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.५०** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:- १०** **प्रशासक ठराव क्र.:- २८३** **दिनांक :-**११/०७/२०२५

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदा.

**विषय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

---

वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

१. प्रशासकीय आदेश क्र.१३/पा.पु.वि. दि.२४/०६/२०२५ अन्वये उमाळा जलशुध्दीकरण केंद्रावर पाणी शुध्दीकरणासाठी PAC (पावडर) खरेदी करणे कामी मक्तेदार श्री.सचिन भिमराव चौधरी,जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.२,८३,२५०/- मात्र खर्चाची संविदा.
२. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./४१/ दि.२८/०५/२०२५ अन्वये मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.०४ मनपा शाळा क्र.१० इस्लामपुरा शनिपेठ येथील पहिल्या मजल्यावर स्वच्छतागृह तयार करणे व दुरुस्ती करणे कामी मक्तेदार अथांग पी. पारेख यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.३,२०,३२३/- मात्र खर्चाची संविदा.
३. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./४२/ दि.२८/०५/२०२५ अन्वये मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.१४ अंतर्गत स्वामी समर्थ केंद्र व गणपती मंदिरा जवळ रस्ता कॉक्रीटीकरण करणे कामी मक्तेदार श्री.अनिकेत मिलिंद चौधरी यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.९,०१,००७/- मात्र खर्चाची संविदा.
४. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./४३/ दि.२८/०५/२०२५ अन्वये मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.०५ मध्ये इस्लामपुरा येथील भुपेंद्र प्रोव्हिजन ते अकिल ईस्माईल वकील यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे कामी मक्तेदार एकविरा इंन्फ्रा यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.९,९२,२७०/- मात्र खर्चाची संविदा.
५. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./४४/ दि.२८/०५/२०२५ अन्वये मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.०५ मध्ये इस्लामपुरा येथील अकिल ईस्माईल वकील ते डॉ.प्रकाश संघवी यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे कामी मक्तेदार श्री.अनिकेत मिलिंद चौधरी यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.९,८१,८७८/- मात्र खर्चाची संविदा.
६. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./४६/ दि.१७/०६/२०२५ अन्वये मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.०६ मधील कैमिस्ट भवन ते श्री.नन्नवरे यांचे घरापर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे कामी मक्तेदार श्री.अजिंक्य सुनिल पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.७,३०,५४३/- मात्र खर्चाची संविदा.
७. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./४७/ दि.२४/०६/२०२५ अन्वये मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.११ मधील पिंप्राळा शिवार रुखमिणी नगर गट नं.१३९ व गट नं.१०६ मध्ये आर.सी.सी. गटार बांधणे कामी मक्तेदार एकविरा इंन्फ्रा यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.९,९०,८६४/- मात्र खर्चाची संविदा.

८. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./४८/ दि.२४/०६/२०२५ अन्वये मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.११ मधील १०० फुटी रोड व रुद्रा स्क्वेअर ते श्रीकृष्णा एजन्सि पर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे कामी मक्तेदार एकविरा इंन्फ्रा यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.९,९०,६९१/- मात्र खर्चाची संविदा.
९. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./४९/ दि.२४/०६/२०२५ अन्वये मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.११ मधील पिंप्राळा शिवार गट नं.१४५ प्लॉट नं.२८ ते प्लॉट नं.१६ पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे कामी मक्तेदार एकविरा इंन्फ्रा यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.९,९९,१९६/- मात्र खर्चाची संविदा.
१०. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./५०/ दि.२४/०६/२०२५ अन्वये मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.०५ अंतर्गत जोशी कुलकर्णी ट्रान्सपोर्ट ते सदगुरु ड्रायफुडस् पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे कामी मक्तेदार श्री.अक्षय किशोर राणे यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.७,२७,००४/- मात्र खर्चाची संविदा.
११. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./५१/ दि.२४/०६/२०२५ अन्वये मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.०३ अंतर्गत जळगांव स.नं.७०/१+३ सागर नगर मध्ये रोड साईडला आर.सी.सी. गटार बांधणे व रोड क्रॉसिंगला स्लॅब कल्व्हर्ट बांधणे कामी मक्तेदार एकविरा इंन्फ्रा यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमी चे दर स्विकृत करुन त्यात इतर शासकीय कर समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.९,९८,८६२/- मात्र खर्चाची संविदा.
१२. प्रशासकीय आदेश क्रं.विदयुत/०१/२०२५-२६ दि.०४/०४/२०२५ अन्वये राष्ट्रीय महामार्ग क्रं.५३ वर जळगांव शहरातील खोटे नगर चौक येथे नव्याने स्वयंचलीत वाहतुक नियंत्रक बसविणे कामी मक्तेदार न्युक्लॉनिक्स ट्रफिक इक्वीपमेन्ट प्रा.लि.पुणे यांचे ई-निविदा रक्कमेपेक्षा ०.५००% कमीचे दर स्विकृत करुन त्यात GST रक्कम समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.१४,०५,९२६/- मात्र खर्चाची संविदा.
१३. प्रशासकीय आदेश क्रं.विदयुत/०२/२०२५-२६ दि.०४/०४/२०२५ अन्वये जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील राष्ट्रीय महामार्ग क्रं.५३ येथिल समांतर रस्त्यावर पोल उभारुन त्यावर एलईडी लावून प्रकाश व्यवस्था करणे कामी मक्तेदार वरद इलेक्ट्रीकल्स वर्क्स,जळगांव यांचे अंदाजित रक्कमेइतके कमीचे दर स्विकृत करुन त्यात GST रक्कम समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.९,२१,९२९/- मात्र खर्चाची संविदा.
१४. प्रशासकीय आदेश क्रं.विदयुत/०५/२०२५-२६ दि.०८/०५/२०२५ अन्वये प्रभाग क्र.१४ मधील आदित्य हॉटेल चौक ते श्री स्वामी समर्थ चौक पर्यंतच्या १८ मीटर रुंद रस्त्यावर ८ मीटर उंचीचे पोल उभारुन प्रकाश व्यवस्था करणे कामी मक्तेदार वरद इलेक्ट्रीकल्स वर्क्स,जळगांव यांचे अंदाजित रक्कमेइतके कमीचे दर स्विकृत करुन त्यात GST रक्कम समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.९,७४,८७१/- मात्र खर्चाची संविदा.
१५. प्रशासकीय आदेश क्रं.विदयुत/०८/२०२५-२६ दि.२६/०५/२०२५ अन्वये विदयुत विभाग यु.क्रं.२ व ४ चे कार्यक्षेत्रात येत असलेल्या प्रभागांमध्ये मा.आमदार यांचे स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव शहरात ठिक ठिकाणी उभारणेत आलेल्या पोलवरील तसेच मनपामार्फत उभारलेल्या पोलवरील व शौचालय ठिकाणी बंद असलेले एलईडी पथदिवे दुरुस्त करणे कामी मक्तेदार न्यु. आर.के.इलेक्ट्रीकल्स,जळगांव यांचे निविदा रक्कमेइतके कमीचे दर स्विकृत करुन त्यात GST रक्कम समाविष्ठ करुन एकूण रक्कम रु.८,९३,५२५/- मात्र खर्चाची संविदा.

उपरोक्त वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार संविदांची माहिती घेतली.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

सही/-
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महान गरपालिका,जळगांव**